I. O.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): सातारा  **P.S.**(ठाणे): शाहुपुरी पोलीस स्टेशन  **Year** (वर्ष): 2019

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0304  **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 22/08/2019 00:39 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7, 7 (अ) |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): बुधवार  **Date From** (दिनांक पासून): 21/08/2019
   **Time Period** (कालावधी): पहर 5  **Date To** ( दिनांक पर्यंत): 21/08/2019
   **Time From** (वेळेपासून): 14:25 बजे
   **Time To** (वेळेपर्यंत): 14:35 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 21/08/2019  **Time** (वेळ): 23:55 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद 003  **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 22/08/2019 00:39 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्तळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पूर्व, 2 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): संकल्प हाईटस,पहिला मजला,संग्राम कार , या दुकानाचे समोर,सातारा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नांव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सिद्धनाथ कानिफनाथ बाबर

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती का नाव)

(c) **Date/Year of Birth** (जन्म 1971  (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):  **Date of Issue** (अदा केल्याची तारीख):

**Place of Issue** (अदा केल्याची ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पुर्ण शांती हाईट्स फ्लॅट , नं2001,20 वा मजला ,खारटन रोड,ठाणे पश्चिम ,ठाणे ,शाहुपुरी पोलीस स्टेशन,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | आयडीबीआय ऑफिसर्स क्वार्टर्स,सदर बाजार सातारा ,सातारा,सातारा,शाहुपुरी पोलीस स्टेशन,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शिवाजी बबन पिसाळ | | | 1. सत्यमनगर, खेड सातारा,खेड सातारा, सातारा ,सातारा,शाहुपुरी पोलीस स्टेशन,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | सतीश किसन कुंभार | | | 1. करंजे पेठ सातारा,सातारा,सातारा, सातारा,शाहुपुरी पोलीस स्टेशन,सातारा, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम सूचना तथ्य ):

खबरी जबाब दिनांक 21/08/2019 मी,सिद्धनाथ कानिफनाथ बाबर वय-48वर्षे व्यावसाय-नोकरी पद-क्षेत्रिंय प्रमुख एवं उप-महाप्रबंधक क्षेत्र आय.डी.बी.आय बँक सातारा सध्या रा.आय.डी.बी.आय ऑफिसर्स क्वार्टर्स सदर बाजार सातारा मुळ रा.पुर्ण शांती हाईट्स फ्लॅट नं.2001,20 वा मजला खारटन रोड,ठाणे पश्चिम मो.नं.9322697065. समक्ष शाहुपूरी पोलीस स्टेशन मध्ये हजर होवून खबरी जबाब देतो की, मी सातारा येथे एकटा राहणेस असुन आयडीबीआय बँक, पोवईनाका सातारा येथे क्षेत्रिय प्रमुख एवं उपमहाप्रबंधक म्हणुन कार्यरत आहे. आमचे आयडीबीआय बँक, पोवईनाका शाखा सातारा यांनी दिनांक 18/03/2015 रोजी हटेल स्माईल एक्झेकेटीव्ह स.नं. 23/4 बी,प्लट नं 17 मौजे गोडोली, ता.जि.साताराचे मालक श्रीमती प्राजक्ता दिपक जाधव यांना सदर मालमत्तेवर व्यवसायाकामी 2.50 कोटी कर्ज दिलेले होते. सदर कर्जास तारण म्हणुन हटेल स्माईल एक्झेकेटीव्ह ही मालमत्ता दिली होती. त्याची नोंद सातारा सब रजिस्टार ऑफिस सातारा 2 रजिस्टेशन नं. 453/2015 दि. 23/03/2015 प्रमाणे केली होती. कर्जदार श्रीमती प्राजक्ता जाधव यांनी त्यांचे कर्जाची वेळेत परतफेड केली नसल्याने मी, आयडीबीआय बँक सातारा क्षेत्रीय प्रमुख या नात्याने त्यांचे विरुध्द रितसर (SARFAESI) क्ट 2002 चे कलम 13 (2) 13(4) प्रमाणे नोटीस काढुन सुध्दा कर्जदार जाधव यांनी त्यांचे थकीत कर्जाची परत फेड न केल्यामुळे सदर मिळकतीचा ताबा मीळणेबाबतचा अर्ज मा. जिल्हाधिकारी सातारा यांना दि.13/03/2018 रोजी दिलेला होता. त्यानंतर मा.जिल्हाधिकारी सातारा यांनी त्यांचेकडील आदेश क्र.डिसी/4/सेक्यु/एसआर-32/2018 दि. 28/11/2018 अन्वये मा. तहसिलदार सातारा यांना मौजे गोडोली, ता.जि. सातारा येथील हटेल स्माईल एक्झेकेटीव्ह स.नं. 23/4 बी, प्लट नं 17 मधील 1100 चौ.मी. क्षेत्रावर ताबा मिळवुन देणेबाबत आदेश निर्गमित केलेले होते. त्यानंतर मा. तहसिलदार सातारा यांनी त्यांचेकडील आदेश क्रमांक एमएजी/कावि/737/2019 दिनांक 20/06/2019 अन्वये मा. मंडलाधिकारी सातारा यांना सदर जागेवर ताबा मिळवुन देण्यासाठी आदेशीत केलेले होते.त्याप्रमाणे दिनांक 20/07/2019 रोजी सातारा मंडलचे मंडलाधिकारी श्री पिसाळ साहेब व त्यांचे सहायक श्री. राजे यांनी योग्य त्या पोलीस बंदोबस्तात मौजे गोडोली, ता.जि. सातारा येथील स.नं. 23/4 बी, प्लट नं 17 मधील 1100 चौ.मी. क्षेत्रावर असलेले हटेल स्माईल एक्झेकेटीव्हचा ताबा घेतला व ते सिल करुन हटेलची चावी माझ्या ताब्यात दिली. त्यानंतर दिनांक 30/07/2019 रोजी हटेल स्माईल एक्झेकेटीव्हचे सिल फोडले असल्याचे आढळुन आल्यामुळे मी

दिनांक 02/08/2019 रोजी सातारा शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे.त्यानंतर मागील आठवडयामध्ये मी मंडलाधिकारी पिसाळ यांचेकडे मौजे गोडोली, ता.जि. सातारा येथील हटेल स्माईल एक्झेकेटीव्ह स.नं. 23/4 बी, प्लट नं 17 मधील 1100 चौ.मी. या क्षेत्राचा ताबा घेतलेबाबतचा अहवाल मा. तहसिलदार सातारा यांना पाठविला काय? याबाबत चौकशी करण्यासाठी सातारा मंडलाधिकारी कार्यालय येथे गेलो असता त्याठिकाणी मंडलाधिकारी श्री. पिसाळ यांची भेट झाली. त्यावेळी आमचेमध्ये संबंधीत मालमत्तेच्या 7/12 वर आयडीबीआय बँकेचे कब्जाची नोंद कधी होणार असे विचारले. त्यावेळी मंडलाधिकारी पिसाळ हे, तुमच काम होईल आमच काम कधी करणार, असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना पुढच्या आठवडयात तुम्हाला भेटतो, काय कराव लागेल ते सांगा असे म्हणालो. त्यावेळी मंडलाधिकारी श्री. पिसाळ यांनी, पंधरा हजार रुपये घेवुन पुढच्या आढवडयात मला भेटा तुमच्या कामाचा अहवाल पाठवुन देतो असे म्हणाले. त्यानंतर मी त्यांना हो म्हणुन तेथुन निघुन आलो. तरी माझी आता अशी खात्री झाली आहे की, मौजे गोडोली, ता.जि. सातारा येथील हटेल स्माईल एक्झेकेटीव्ह स.नं. 23/4 बी, प्लट नं 17 मधील 1100 चौ.मी. या क्षेत्राचा ताबा घेतलेचा अहवाल मा. तहसिलदार सातारा यांना पाठविणेसाठी मंडलाधिकारी पिसाळ हे माझ्याकडुन पंधरा हजार रुपये घेतल्याशिवाय सदरचा अहवाल मा. तहसिलदार सातारा यांना पुढे पाठविणार नाहीत अशी माझी खात्री झाली म्हणुन मी दिनांक 21/08/2019 रोजी मंडलाधिकारी पिसाळ यांची सातारा मंडलाधिकारी कार्यालयात जावुन त्यांना नाईलाजाने पंधरा हजार रुपये नेवुन देणार असल्याबाबतची तक्रार मी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा येथील शिर्के साहेब यांना दिनांक 20/08/2019 रोजी प्रत्यक्ष भेटुन सांगितली. त्यावेळी श्री. शिर्के साहेब, पोलीस उपअधीक्षक यांनी मला दिनांक 21/08/2019 रोजी 11.00 वाजता म.रा. वि.वि.कंपनी कृष्णानगर सातारा येथील विश्रामगृह, येथे येवुन थांबण्याची सुचना दिली.त्यानंतर श्री. शिर्के साहेब, पोलीस उपअधीक्षक यांनी दिनांक 21/08/2019 रोजी म.रा.वि.वि.कंपनी कृष्णानगर सातारा येथे येवुन माझ्याशी संपर्क साधुन मला त्या ठिकाणी बोलावुन घेतले. त्यावेळी श्री. शिर्के साहेब, व पथक कक्ष नं. 2 येथे सापळा कारवाईचे साहीत्यासह हजर होते. त्याठिकाणी श्री. शिर्के साहेबांनी, माझी व पोलीस निरीक्षक आरीफा मुल्ला यांची ओळख करुन देवुन त्या सापळा अधिकारी असल्याचे सांगितले. त्यानंतर नगर रचना, सातारा कार्यालयातील 1) श्री.राजकुमार कल्लेश्वर टकले, सहायक आरेखक व 2) सौ. गौरी संजय पोरे, कनिष्ठ लिपीक या दोन पंचांसह व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर मी, माझा टंकलीखीत तक्रारी अर्ज पोलीस निरीक्षक आरीफा मुल्ला यांचेकडे हजर केला. त्याचे त्यांनी व दोन्ही पचांनी वाचन केले. त्यानंतर माझ्या तक्रारीप्रमाणे माझ्याकडे लाच मागणी झाली अगर कसे? याची पडताळणी करण्यासाठी पंच नं. 1 म्हणुन श्री. टकले व पंच नं. 2 म्हणुन सौ. पोरे यांनी काम करण्याचे पो.नि.मुल्ला यांनी ठरविले त्यानंतर माझ्या तक्रारी अर्जावर पोनि.मुल्ला व दोन्ही पंचांनी सह्या केल्या त्यानंतर पोनि. मुल्ला यांनी मला व पंच नं. 1 यांना पडताळणी कारवाईचे अनुषंगाने सुचना देवुन व्हाईस रेकर्डरसह पंच नं. 1 श्री. टकले यांचेकडील दुचाकी वाहनाने त्यांचेसह मंडलाधिकारी पिसाळ यांची भेट घेण्यासाठी रवाना करुन पडताळणी केली असता त्यामध्ये मंडलाधिकारी पिसाळ व माझी तसेच पिसाळ साहेबांचे मदतनिस कुंभार यांची समक्ष भेट झाली. त्यावेळी मंडलाधिकारी पिसाळ व त्यांचे खाजगी मदतनीस कुंभार यांनी आमचे आयडीबीआय बँक पोवईनाका सातारा याचा मौजे गोडोली ता.जि.सातारा येथील हटेल स्माईल एक्झेकेटीव्ह स.नं. 23/4 बी, प्लट नं. 17 मधील 1100 चौ.मी. क्षेत्रावर ताबा घेतलेबबातचा अहवाल मा. तहसिलदार सातारा यांना पाठविल्याचे मोबदल्यात तडजोडीअंती 10,000/- रुपयांची लाच मागणी करुन ती लाच रक्कम लागलीच सातारा मंडलाधिकारी कार्यालयात स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची रेकर्ड झालेल्या संभाषणावरुन व माझ्या तसचे पंच नं. 1 यांचे हकिकतीवरुन पोलीस निरीक्षक मुल्ला व दोन्ही पंचांची खात्री झाली. त्यानंतर पोलीस निरीक्षक मुल्ला यांचे सुचनेनुसार मी 10,000/- रुपये हजर केले. त्या नोटांचे क्रमांक एका को-या कागदावर लिहुन ठेवुन त्या लाच रकमेस अंथ्रासिन पावडर लावणे बाबतची कारवाई कक्ष नं. 2 मध्ये केली. सापळा कारवाईसंबंधाने पोलीस निरीक्षक मुल्ला यांनी मला व दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास, सापळा कारवाईचे अनुशंगाने आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर माझ्याकडे व्हाईस रेकर्डर देवुन पंच नं.1 यांना माझ्या सोबत पंच नं. 1 यांचे दुचाकी वाहनावरुन पिसाळ साहेब यांची भेट घेण्याकामी सातारा मंडलाधिकारी कार्यालयाकडे रवाना केले. सोबत पोनि.मुल्ला, पोलीस उपअधीक्षक श्री. शिर्के साहेब व पथका असे सर्वजण आमचे पाठोपाठ आले.मी व पंच नं. 1 असे दुचाकी वाहनाने मंडलाधिकारी कार्यालय सातारा येथे गेलो.तेथे सर्कल कार्यालयाचे आवारात पंच नं. 1 यांनी दुचाकी वाहन पार्क करुन आम्ही दोघे पायी चालत मंडलाधिकारी पिसाळ बसतात त्या खोलीमध्ये गेलो. त्यावेळी पोनि.मुल्ला व सापळा पथक आजुबाजुस थांबुन होते. सदर खोलीमध्ये मंडलाधिकारी पिसाळ व खाजगी इसम कुंभार नव्हते. त्यामुळे मी, मंडलाधिकारी पिसाळ व खाजगी इसम कुंभार यांचेबाबत तेथे असलेले विचारपुस केली त्यावेळी ते जेवणासाठी गेल्याचे समजले, त्यामुळे आम्ही दोघे कार्यालयाचे बाहेर येवुन थांबुन राहीलो. त्यावेळी आमचे बँकेतील एक कर्मचारी त्याठिकाणी आले होते त्यांना मी, मंडलाधिकारी पिसाळ व खाजगी इसम तेथे नसल्याबाबत सांगितले. त्यावेळी त्या कर्मचाऱ्याने त्यांचे मोबाईल फोनवरुन कुंभार यांना फोन केला. त्यावेळी त्यांनी फोनवर बाबर साहेब आले असल्याचे सांगितले, त्यावेळी त्या कर्मचाऱ्याने मला हळु आवाजात कुंभार यांनी मेढा रोडवर असलेले समसंगचे सर्व्हीस दुकानाजवळ येण्याबाबत सांगितले. त्याबाबत मी, पंच नं. 1 यांना सांगितले. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे दुचाकी वाहनाने माझ्या माहीतीप्रमाणे मेढा रोडवरील समसंग सर्व्हीसींगचे दुकान असलेल्या इमारतीचे समोर गेलो. आमचे पाठोपाठ पोनि.मुल्ला व सापळा पथक आले. त्या ठिकाणी पंच नं. 1 यांनी पार्किंगमध्ये वाहन लावले, त्यावेळी समोरील इमारतीचे पहील्या मजल्याचे संग्राम कार या दुकानाचे समोरील मोकळया पसेजमध्ये खाजगी इसम कुंभार उभे होते. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे पायी चालत खाजगी इसम कुंभार यांचेजवळ गेलो. त्यावेळी माझ्यात व खाजगी इसम कुंभार यांचेमध्ये आमचे कामाबाबत चर्चा झाली. त्यावेळी मी, राजे साहेब मला सांगा पिसाळ साहेब कुठे आहेत असे विचारताच खाजगी इसम कुंभार यांनी, पिसाळ साहेब जेवायला गेलेत असे सांगितले. त्यावर मी, मग आता कोणाकडे देवु, असे विचारताच त्या खाजगी इसम कुंभार यांनी दयाकी माझकड काय अडचण काय असे म्हणाले. त्यानंतर मी, मंडलाधिकारी पिसाळ यांचा फोन नंबर खाजगी इसम कुंभार यांचेकडुन घेवुन मंडलाधिकारी पिसाळ यांना त्यांचे मोबाईलवर फोन लावला व स्पिकर ऑन केला त्यावेळी मी, हां पिसाळ साहेब बाबर बोलतोय, मी आयडीबीआय बँकेतुन हां आता राजे साहेब आलेत तर ते दहा हजार, दयायचे त्यांचेकडे असे मंडलाधिकारी पिसाळ यांना विचारताच त्यांनी,हो हो असे म्हणाले. त्यावेळी मंडलधिकारी पिसाळ यांनी सदरची 10,000/- रुपये लाच रक्कम कुंभार या खाजगी इसमाकडे देण्यास सांगितले. त्यानंतर माझ्यात व खाजगी इसम कुंभार यांच्यामध्ये आमचे बँकेचे कामाबाबत चर्चा झाली. त्यानंतर खाजगी इसम कुंभार यांनी त्यांचा उजव्या हाताचा अंगठा तर्जनीवर घासुन लाच मागणीचा सुचक इशारा केला. त्यावेळी मी माझ्या शर्टचे छातीवरील डावे बाजुचे खिशातुन लाच रक्कम काढुन खाजगी इसम कुंभार यांच्यासमोर धरली व मोजुन घ्या दहा म्हणतोय पण मोजुन घ्या असे म्हणालो. त्यावर खाजगी इसम कुंभार म्हणाले, हो दयाकी, असे म्हणुन त्यांनी ती लाच रक्कम दोन्ही हातांनी मोजत मोजत, कायतरी लागलय नवीन नोटा आहेत ना सगळ्या असे म्हणाले. त्यावर मी, झटकुन घ्या नविन नोटा आहेत बँकेतुन घेवुन आलो असे सांगितले. त्यानंतर खाजगी इसम कुंभार यांनी, हो असे म्हणुन त्यांनी ती लाच रक्कम त्यांच्या शर्टचे छातीवरील पुढील बाजुचे डावे खिशात ठेवली. त्यानंतर मी माझा डावा हात डोक्यावरुन दोन वेळा फिरवुन लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशार केला तो इशारा पाहुन पोलीस निरीक्षक मुल्ला, पोलीस उपअधीक्षक श्री. शिर्के साहेब व पथक माझ्या जवळ आले. पोनि. मुल्ला यांनी माझ्याकडील व्हईस रेकर्डर काढुन बंद केला व मला थोडे बाजुला थांबण्यास सांगितले. त्यानंतर पोलीस निरीक्षक मुल्ला यांनी खाजगी इसम कुंभार यांना पकडले अवस्थेत संग्राम कार या दुकानात घेवुन गेले व त्या दुकानाचे शटर बंद केले. त्यानंतर पो.नि. मुल्ला यांनी मला त्या दुकानात बोलावुन माझी अल्ट्रा व्हायोलेट

दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता माझ्या उजव्या हाताचे बोटांचे पेऱ्यास व तळहातास तसेच माझ्या शर्टचे छातीवरील खिशाचे आतील बाजुस अंथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर पोलीस निरीक्षक मुल्ला यांनी मला सांगितले की, खाजगी इसम सतिश किसन कुंभार यांना ताब्यात घेवुन त्यांची संग्राम कार या दुकानात तपासणी केली, त्यावेळी त्यांचे अंगातील शर्टचे छातीवरील डाव्या बाजुचे खिशाचे

13. **Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Mugutrao Bhanudas patil(I (Inspector)) / POBN73313 **or**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे **Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची
**Name** (नाव): Mugutrao Bhanudas patil
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN73313

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**